01 SEP 2020

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांच्या अपेक्षांचे अभ्यासक्रमात रूपांतर होणे गरजेचे

## महाराष्ट्र शासनाच्या 'एनईपी-२०२०' टास्क फोर्सचे अध्यक्ष प्राचार्य अनिल राव : विद्यार्थ्यांची गळती रोखणे गरजेचे

**जनप्रवास : कोल्हापूर**

विद्यार्थ्यांच्या अपेक्षा आणि आकांक्षांचे प्रतिबिंब अभ्यासक्रमात उमटून त्यांचे रूपांतर प्रत्यक्ष शिक्षणात झाले पाहिजे. विद्यार्थ्यांना विषय निवडीचे स्वातंत्र्य, बहुविषयांचे शिक्षण, कौशल्याधारित शिक्षण, इंटर्नशिप तसेच विविध माध्यमांतून क्रेडिट मिळविण्याच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची (एनईपी-२०२०) अंमलबजावणी सर्व स्तरांवर प्रभावीपणे होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र शासनाच्या 'एनईपी-२०२०' टास्क फोर्सचे अध्यक्ष प्राचार्य अनिल राव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील आंतरविद्याशाखीय अभ्यास आणि शिक्षणशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने अभ्यास मंडळांचे अध्यक्ष, अधिविभागप्रमुख, प्रशासकीय अधिकारी यांच्यासाठी 'एनईपी-२०२०ची अंमलबजावणी आणि त्यामधील आव्हाने' या विषयावर आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. राजनीश कामत होते. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, आंतरविद्याशाखा अधिष्ठाता डॉ. अजय साळी, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.



**शिवाजी विद्यापीठातील आयोजित कार्यशाळेचे उद्घाटन करताना प्राचार्य अनिल राव. सोबत डॉ. विलास शिंदे, डॉ. अजय साळी, विवेक सिनारे, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलगुरू डॉ. राजनीश कामत, डॉ. चेतना सोनकांबळे.**

राव म्हणाले, एनईपीची अंमलबजावणी करताना विद्यापीठांनी पारंपरिक व कठोर चौकटींपलीकडे जाऊन विद्यार्थ्यांना अधिकाधिक लवचिक पर्याय उपलब्ध करून देण्याची गरज आहे. बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम, 'कॅफेटेरिया अ‍ॅप्रोच'द्वारे विषय निवडीचे स्वातंत्र्य, विविध संस्थांमधून क्रेडिट मिळविण्याची सुविधा, कौशल्य व ऑन-जॉब ट्रेनिंग, अप्रेंटिसशिप, मातृभाषेतून शिक्षण आणि पूर्वज्ञानाला मान्यता अशा संधी विद्यार्थ्यांना मिळाल्या पाहिजेत. यासाठी अभ्यास मंडळांनी विद्यार्थ्यांच्या आकांक्षा आणि बदलत्या जगाच्या गरजा समजून घेऊन अभ्यासक्रमांचे पुनरावलोकन करावे. शिक्षक व प्रशासकीय यंत्रणेने मानसिकतेतील पारंपरिक बंधने दूर करून प्रयोगशीलता स्वीकारावी, असे आवाहन त्यांनी केले. विवेक सिनारे यांनीही मार्गदर्शन केले.

कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, उच्चशिक्षणाचे लोकशाहीकरण हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट असून, ते साध्य करण्यासाठी एनईपी-२०२०ची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे. उच्चशिक्षणातील प्रवेशाचे प्रमाण २०३५ पर्यंत ५० टक्क्यांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी शाळेपासून उच्चशिक्षणापर्यंत विद्यार्थ्यांची गळती रोखणे गरजेचे आहे. त्यासाठी 'स्कूल कनेक्ट'सारखे उपक्रम, बहुविषयांचे शिक्षण, मल्टिपल एंट्री-मल्टिपल एक्झिट, कौशल्याधारित शिक्षण आणि, विद्यार्थीकेंद्रित परीक्षा पद्धती यांची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. यावेळी डॉ. चेतना सोनकांबळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी परिचय करून दिला. डॉ. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी अजितसिंह जाधव, राजाराम गुरव, महादेव देशमुख, शरद बनसोडे, रामचंद्र पवार, सागर डेळेकर आदी उपस्थित होते.

0 1 SEP 2026
सकाळ

# पारंपरिक बंधने दूर करून प्रयोगशीलता स्वीकारा : राव

## विद्यापीठात शैक्षणिक धोरणावर कार्यशाळा



अनिल राव

कोल्हापूर, ता. ३१ : राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची (एनईपी) अंमलबजावणी करताना अभ्यास मंडळांनी विद्यार्थ्यांच्या आकांक्षा आणि बदलत्या जगाच्या गरजा समजून घेऊन अभ्यासक्रमांचे पुनर्वालोकन करावे. शिक्षक व प्रशासकीय यंत्रणेने मानसिकतेतील पारंपरिक बंधने दूर करून प्रयोगशीलता स्वीकारावी, असे आवाहन शासनाच्या 'एनईपी-२०२०' टास्क फोर्सचे अध्यक्ष प्राचार्य अनिल राव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील आंतरविद्याशाखीय अभ्यास आणि शिक्षणशास्त्र अधिविभागातर्फे 'एनईपी-२०२०ची अंमलबजावणी आणि त्यामधील आव्हाने' या विषयावर घेतलेल्या कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. आर. के. कामत, तर प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, आंतरविद्याशाखा अधिष्ठाता डॉ. अजय साळी, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित होते. एनईपीच्या अंमलबजावणीतील मोठे आव्हान हे प्रशासकीय नसून मानसिकता, धोरणाची समज आणि विविध संस्थांमध्ये आवश्यक असलेली सुसूत्रता हे आहे. त्यामुळे धोरणकर्ते, शिक्षक, प्रशासकीय अधिकाऱ्यांनी कार्यशाळेपुरते मर्यादित न राहता त्यातील विचार प्रत्यक्ष शैक्षणिक व्यवहारात आणण्याची सामूहिक जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन कुलगुरू डॉ. कामत यांनी केले. रेझोनन्स आंत्रप्रेन्युअर अँड एम्प्लॉएबिलिटी सोल्युशन्सचे व्यवस्थापकीय संचालक विवेक सिनारे यांनी कौशल्यविकास, रोजगाराच्या संधींविषयी मार्गदर्शन केले.

डॉ. अजितसिंह जाधव, राजाराम गुरव, महादेव देशमुख, शरद बनसोडे, रामचंद्र पवार, सागर डेळेकर, विद्यानंद खंडागळे, सुप्रिया पाटील उपस्थित होते. शिक्षणशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी स्वागत केले.

विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठातील जुन्या इमारतींचा उपयोग: नवी अध्यासने आणि अभ्यासक्रमांना मिळतेय चालना

# जुनी क्वार्टर्स 'ज्ञानकेंद्रा'द्वारे नव्या रूपात

**शिवाजी विद्यापीठात स्थापनेनंतर येथे येणाऱ्या प्राध्यापकांसाठी विद्यापीठ परिसरातच निवासस्थाने उभारली गेली. काळाच्या ओघात त्यातील काही कमकुवत झाल्याने त्यांचा वापर बंद झाला. अशा अडगळीच्या बनलेल्या निवासस्थानांचा गेल्या काही वर्षांत विद्यापीठ प्रशासनाने चांगला वापर करण्याचा निर्णय घेत पावले उचलली. आता ही निवासस्थाने विविध शाखांसाठी अध्यासने उभारण्यात उपयुक्त ठरली आहेत. या ज्ञानकेंद्रांवर आजपासून प्रकाश टाकणारी ही मालिका.**




▌दामाजी जावीर, कोल्हापूर

कोल्हापूरात १८ नोव्हेंबर १९६२ रोजी स्थापन झालेल्या शिवाजी विद्यापीठाने पश्चिम महाराष्ट्रातील उच्च शिक्षणाला नवी दिशा दिली आहे. स्थापनेच्या सुरुवातीपासूनच हे विद्यापीठ केवळ अध्यापनापुरते मर्यादित न राहता 'निवासी विद्यापीठ" संकल्पनेवर विकसित करण्यात आले. त्या काळात देशातील अनेक प्रमुख विद्यापीठांप्रमाणेच शिक्षक, अधिकारी, कर्मचारी विद्यापीठ परिसरातच वास्तव्यास असावेत, शैक्षणिक वातावरण २४ तास जिवंत राहावे आणि विद्यार्थी–शिक्षक संवाद अधिक सशक्त व्हावा, या उद्देशाने निवासी क्वार्टर्स उभारण्यात आल्या होत्या.

विद्यापीठाच्या विस्तीर्ण परिसरात सद्यस्थितीत ९८ निवासी क्वार्टर्स आहेत. त्यापैकी ६१ क्वार्टर्स सध्या वापरात आहेत. उर्वरित क्वार्टर्सचे टप्प्याटप्प्याने नूतनीकरण आणि पुनर्वापर करण्याचे काम सुरू आहे. ही निवासी व्यवस्था केवळ राहण्यासाठीची सुविधा नव्हती, तर विद्यापीठाच्या शैक्षणिक आणि बौद्धिक संस्कृतीचा अविभाज्य भाग होती.

विद्यापीठाच्या सुरुवातीच्या काळात प्राध्यापक कॅम्पसमध्ये वास्तव्यास असल्याने वर्गातील अध्यापनापलीकडेही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळत असे. संशोधन, अभ्यास गट, प्रबंध लेखन, सांस्कृतिक उपक्रम आणि विविध शैक्षणिक चर्चांचे केंद्र म्हणून हा निवासी परिसर ओळखला जात होता. विद्यार्थ्यांच्या अडचणींवर त्वरित चर्चा, विभागीय नियोजन आणि शैक्षणिक वातावरण टिकवून ठेवण्यात या निवासी संस्कृतीची मोठी भूमिका होती. शिक्षण क्षेत्रातील अभ्यासकांच्या मते, निवासी विद्यापीठ ही संकल्पना केवळ निवासव्यवस्थेपुरती मर्यादित नसते. ती शिक्षण, संशोधन, संस्कार आणि ज्ञाननिर्मिती यांचा एकात्म अनुभव देणारी व्यवस्था असते. जगातील अनेक नामांकित विद्यापीठांनी संकल्पना यशस्वीपणे राबवली आहे.

जुन्या विद्यापीठांमध्येही अशा निवासी वसाहतींना विशेष महत्त्व होते. शिवाजी विद्यापीठातील क्वार्टर्स ही त्याच परंपरेचा एक महत्त्वाचा वारसा मानली जातात. सहा दशकांहून अधिक काळ या निवासी वसाहतींनी अनेक प्राध्यापक, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे वास्तव्य अनुभवले आहे. विद्यापीठाच्या जडणघडणीतील अनेक महत्त्वपूर्ण शैक्षणिक निर्णय, संशोधन उपक्रम आणि विद्यार्थी चळवळींच्या आठवणी परिसराने जपल्या आहेत. त्यामुळे या क्वार्टर्सचे महत्त्व केवळ वास्तू म्हणून नाही, तर विद्यापीठाच्या इतिहासाचा, शैक्षणिक परंपरेचा जिवंत दस्तऐवज म्हणूनही वापर होत आहे.

### नव्या शैक्षणिक परिवर्तनाचे केंद्र

**बदलत्या काळात उच्च शिक्षणाचे स्वरूप बदलले, तरी विद्यापीठाच्या पायाभूत सुविधांचा सुयोग्य वापर आणि निवासी संस्कृतीचा वारसा जपण्याचे महत्त्व आजही कायम आहे. त्यामुळे या क्वार्टर्सचा इतिहास समजून घेतल्याशिवाय शिवाजी विद्यापीठाच्या विकासाचा प्रवास पूर्ण होऊ शकत नाही. एकेकाळी प्राध्यापकांच्या वास्तव्यासाठी उभारलेल्या या क्वार्टर्स आज नव्या शैक्षणिक परिवर्तनाचे केंद्र ठरत आहेत. 'विद्यापीठ बदलतयं' याद्वारे ज्ञानकेंद्रांचा विकास सुरू झाला आहे.**

### जुन्या वास्तूंचे ज्ञानकेंद्रांमध्ये रुपांतर करण्यावर भर

**विद्यापीठातील जुन्या निवासस्थानांचे जतन करताना त्यांना केवळ वास्तू म्हणून जपण्याऐवजी ज्ञाननिर्मितीच्या नव्या केंद्रांमध्ये रुपांतरित करण्याचा प्रयत्न आहे. या वास्तूंची पडझड थांबवून त्यांचा शैक्षणिक वापर वाढवणे, हा या संकल्पनेमागील मुख्य उद्देश आहे. त्यामुळे जुन्या वास्तूंना नवे आयुष्य मिळत असून त्याच ठिकाणी विविध अभ्यासने, संशोधन व शैक्षणिक उपक्रमांना चालना मिळत आहे. नवीन इमारती उभारण्यासाठी मोठा निधी खर्च करण्याऐवजी उपलब्ध जागा आणि पायाभूत सुविधांचा कल्पकतेने वापर केल्यामुळे विद्यापीठाचा बांधकामावरील खर्चही वाचत आहे. 'जुन्याचे जतन आणि नव्याची निर्मिती' या दोन्ही गोष्टी साध्य करत विद्यापीठाच्या संसाधनांचा शाश्वत आणि परिणामकारक वापर करण्याची ही संकल्पना आहे.**

■ **डॉ. व्ही. एन. शिंदे, कुलसचिव शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

01 SEP 2026

सकाळ

जनसपर्क कक्ष
'शवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# परदेशी भाषांमुळे मोठ्या पॅकेजची परदेशात संधी

## जर्मन, जपानीसह अन्य भाषांना मागणी; पश्चिम महाराष्ट्रातील पाच हजारांवर विद्यार्थी घेतात शिक्षण

■ शिवाजी यादव : सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ३१ : परदेशी भाषा अवगत असल्यास परदेशात चांगल्या पगाराची नोकरी मिळते. तेथे अधिक काळ राहण्याची संधी, जीवनात स्थैर्य आणि मुलांच्या शिक्षणाला आधार मिळतो. त्यासाठी विविध परदेशी भाषा शिकण्याचा कल तरुणाईत वाढतो आहे. मात्र, पश्चिम महाराष्ट्रातील ग्रामीण भागात परदेशी भाषा शिक्षणाच्या सुविधा मर्यादित असल्याने कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांतील सुमारे पाच हजारांहून अधिक कॉर्पोरेट कर्मचारी व विद्यार्थी पुण्यासह मोठ्या शहरांत परदेशी भाषांचे शिक्षण घेत आहेत.**

> भविष्यात परदेशात नोकरी करण्याची इच्छा असलेल्या तरुणांमध्ये जर्मन आणि जपानी भाषा शिकण्याचा कल वाढत आहे. संबंधित देशाची भाषा अवगत असल्यास तेथे नोकरी मिळविताना प्राधान्य मिळते. भाषा कौशल्याचे प्रथम, द्वितीय आणि तृतीय श्रेणीनुसार मूल्यांकन केले जाते. परदेशी भाषा चांगल्या प्रकारे लिहिता, वाचता आणि बोलता येणाऱ्या उमेदवारांना नोकरीच्या ठिकाणी अधिक चांगले स्थान आणि त्यानुसार लाभ मिळण्याची शक्यता असते. त्यामुळे करिअरच्या दृष्टीने परदेशी भाषा शिकण्याकडे तरुणांचा कल वाढत आहे.
>
> - **अक्षय मोर्चे**, आयटी अभियंता

गेल्या १५ वर्षांत बीई इलेक्ट्रॉनिक्स, आयटी, मेकॅनिकल असे अभियांत्रिकी शिक्षण तसेच बँकिंग, बिझनेस मॅनेजमेंट आदी अभ्यासक्रम पूर्ण करून विद्यार्थी कॅम्पस इंटरव्ह्यूच्या माध्यमातून नोकरी मिळवत आहेत. पुणे, मुंबई, बंगळूर, हैदराबाद, नोएडा आणि दिल्ली अशा शहरांतील कॉर्पोरेट क्षेत्रात नोकरी करीत आहेत. त्यात कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांतील सुमारे १५ हजारांहून अधिक अभियंते आयटी क्षेत्रात पुण्यासह अन्य शहरांमध्ये कार्यरत आहेत.

### पाच वर्षांनंतर परदेशात संधी

पाच वर्षे एका कंपनीत काम केल्यानंतर काही कर्मचाऱ्यांना कंपनी परदेशात पाठवते. परदेशातील अधिकारी व कर्मचाऱ्यांशी नियमित सुलभ संवाद साधण्यासाठी भाषेचे ज्ञान महत्त्वाचे ठरते. त्यामुळे जर्मनी, जपान, स्पेन आणि रशिया अशा देशांत तेथील भाषा अवगत असलेल्या कर्मचाऱ्यांना नोकरीच्या ठिकाणी प्राधान्य मिळते. करारानुसार कर्मचाऱ्यांना किमान तीन ते पाच वर्षे परदेशात राहावे लागते. कुटुंबासह वास्तव्य करताना मुलांच्या शिक्षणासाठी स्थानिक भाषेतील शाळांमध्ये मुलांना प्रवेश देणे तुलनेने सोयीचे व कमी खर्चिक ठरते. त्याचबरोबर स्थानिक नियम, व्यवहार आणि परिचितांशी संवाद साधण्यासाठी तेथील भाषा येत असल्यास परदेशातील वास्तव्य अधिक सुलभ होते. नोकरी लागताच सुरुवातीची तीन-चार वर्षे पुण्यासारख्या शहरात काम करतानाच भविष्याचा अंदाज घेऊन काही तरुण जर्मन, जपानी, रशियन आणि स्पॅनिश भाषा शिकत आहेत.

### सहा महिने, एक वर्षाचे अभ्यासक्रम

पुण्यात परदेशी भाषा शिकण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासह काही खासगी संस्था कार्यरत आहेत. त्यापैकी जर्मन सरकारमान्य संस्थेकडूनही जर्मन भाषेचे प्रशिक्षण दिले जाते. याशिवाय शहरात सुमारे ४० ते ५० खासगी शिक्षकांकडून परदेशी भाषा वर्ग घेतले जात असून, ऑनलाईन प्रशिक्षणालाही मोठा प्रतिसाद मिळत आहे. जर्मन भाषा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या एका बॅचमध्ये साधारण २० विद्यार्थी असतात. त्यांना गटामध्ये जर्मन भाषेत संवाद साधण्याचा सराव करून घेतात.

साधारण एक ते दोन वर्षांचे प्रशिक्षण घेतले जाते, तर काही विद्यार्थी सहा महिन्यांचे अल्पकालीन प्रशिक्षणही घेतात. एका भाषेच्या प्रशिक्षणासाठी वर्षाला साधारण २० ते ३५ हजार रुपये शुल्क आहे. नामांकित संस्थांमध्ये दीर्घकाळ प्रशिक्षण घेतल्यास हे शुल्क ५० हजार रुपयांपेक्षा अधिक होते. सुमारे ६० ते ७० टक्के विद्यार्थी किमान सहा महिने ते एक वर्षाचे प्रशिक्षण पूर्ण करतात.

01 SEP 2026
तरुण भारत

# सुरक्षा, तरलता, परताव्याचा समतोल राखणे गरजेचे

त. भा. प्रतिनिधी

- महाव्यवसर्वानिन एम. यांचे प्रतिपादन
- शिवाजी विद्यापीठात बँकिंगविषयी कार्यशाळा

**कोल्हापूर :** ठेवीदारांचा विश्वास आणि बँकेची नफाक्षमता वाढवण्यासाठी ट्रेझरी मॅनेजमेंटमधील सुरक्षा, तरलता व परतावा' या तिन्ही तत्त्वांचा समतोल राखणे अत्यंत गरजेचे आहे, असे प्रतिपादन भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पर्यवेक्षण विभागाचे महाव्यवस्थापक सर्वानिन एम. यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे गुरूवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर डिस्ट्रीक्ट अर्बन बँक्स को-ऑपरेटीव्ह असोसिएशन लिमिटेड, कोल्हापूर व एसटीसीआय प्रायमरी डिलर्स लिमिटेड, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने व्यवस्थापन विकास कार्यक्रमांतर्गत एकदिवसिय बँकिंग कार्यशाळेत ते बोलत होते. 'फिक्स्ड इन्कम मार्केट्स इन इंडिया: करंट ट्रेंड्स, थीम्स अँड परस्पेक्टीव्हज् फॉर अर्बन को-ऑपरेटीव्ह बँक्स' त्यांनी मार्गदर्शन केले. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कुलगुरू डॉ. राजनीश कामत अध्यक्षस्थानी होते.

कुलगुरू डॉ. कामत यांनी आजचे तंत्रज्ञान व बाजारातील साधने दिवसेंदिवस बदलत आहेत. या बदलांशी जुळवून घेणे आवश्यक आहे. केंद्राचे समन्वयक डॉ. सुभाष कोंबडे यांनी स्वागत केले. एसटीसीआय संशोधन विभागाचे प्रमुख आदित्य व्यास यांनी आभार मानले. यावेळी आरबीआय (मुंबई) चे सहाय्यक महाव्यवस्थापक निलेश गावडे, उपाध्यक्ष संध्या शशी, सहाय्यक उपाध्यक्ष गुरूदत्त कुलकर्णी, सीईओ सुरेश शिंदे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

01 SEP 2026
तरूण भारत

## भन्ते डॉ. यश काश्यपायन : बार्टीच्या आजी-माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

# संविधानात बंधुतामूल्य सर्वोच्च

**भारतीय संविधान मानवतावादाची शिकवण देणारे असून त्यातील बंधुता मूल्य सर्वोच्च महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन भन्ते डॉ. यश काश्यपायन यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या आजी-माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहमेळाव्यात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. कुलसचिव डॉ. विलास शिंदे स्नेहमेळाव्याच्या अध्यक्षस्थानी होते.**

**त. भा. प्रतिनिधी**

कोल्हापूर : भन्ते डॉ. काश्यपायन म्हणाले, माणसाने दुसऱ्या माणसांचा शत्रू होऊ नये, परस्परांमध्ये ऐक्य व मानवतेची भावना निर्माण व्हावी, यासाठी संविधानाची गरज आहे. मानवाचे संरक्षण व त्याच्या प्रतिष्ठेचे जतन करण्यासाठी भारतीय संविधानाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. त्यादृष्टीने संविधान आणि बुद्धाच्या धम्मातील मानवतावादी विचारांमध्ये खूप साम्य आहे.

बुद्धाची शिकवण माणसाला अहंकार, क्रोध आणि द्वेषापासून दूर नेत असून मैत्री, करुणा आणि सर्व जीवांप्रती असीम दया बाळगण्याचा मार्ग दाखवते. बुद्धाच्या धम्माचा केंद्रबिंदू मानव आणि मानवतेशी संबंधित असून मनुष्य हा जगाचे रक्षणही करू शकतो आणि विनाशही करू शकतो, त्यामुळे मानवतेचे संरक्षण करणे ही सर्वांची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवांचे विचार आणि कार्य वेगवेगळे न पाहता त्यातील सकारात्मक विचारांची सांगड घालण्याची गरज आहे.



**कोल्हापूर : कार्यक्रमात बोलताना भन्ते डॉ. यश काश्यपायन.**

धम्माचे गाढे अभ्यासक अमित मेधावी म्हणाले, पाली भाषा ही केवळ एक प्राचीन भाषा नसून भारतीय मानवतावादी परंपरेचे मूळ तत्त्वज्ञान समजून घेण्याची गुरुकिल्ली आहे.

विविध अभ्यासक्रमांमध्ये प्रावीण्यप्राप्त विद्यार्थ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. केंद्राचे संचालक डॉ. पवन गायकवाड यांनी स्वागत केले. सागर कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी शशिकांत कांबळे, सुरेखा नरदे, विजय कुशाण, नेहा विटेकरी, सुप्रभा चोपडे, सिद्धार्थ दीक्षित, समर्थ भारतीय, डॉ. बालाजी लातुरे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. कुलवीर कांबळे, डॉ. दीपा श्रावस्ती, डॉ. अमोल मिणचेकर आदींसह डॉ. कपिल राजहंस, ॲड. करूणा मिणचेकर, अनिल वेटम, डॉ. चंद्रकांत कुरणे, डॉ. तेजपाल मोहरेकर उपस्थित होते.

0 1 SEP 2026

जनसपर्क कक्ष
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आवाज वाढतोय, रोखणार कोण?

## ध्वनी मर्यादांना साउंड सिस्टीमचा 'ठेंगा'

■ संतोष मिठारी : सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ३१ : भक्तीच्या जल्लोषाला ध्वनी प्रदूषणाची कर्कश किनार लाभत आहे. कोल्हापुरातील सार्वजनिक गणेश विसर्जन मिरवणुकीतील साउंड सिस्टीमचा आवाज वाढत आहे. शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागाने पाच वर्षांत अनंत चतुर्दशीदिनी ध्वनी मापन केले. त्यात ध्वनी मर्यादेचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.**

बिंदू चौकापासून महाद्वार रोड, पापाची तिकटी, गंगावेशपर्यंत नागरिकांना कानठळ्या बसविणाऱ्या आवाजाचा सामना करावा लागत असल्याने 'उत्सवाचा आनंद की आरोग्याशी खेळ?' असा सवाल उपस्थित झाला आहे. शहराच्या विविध भागांतील शांतता, निवासी, व्यावसायिक, औद्योगिक क्षेत्रातील ३० ठिकाणी शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागातर्फे दरवर्षी अनंत चतुर्दशीच्या दिवशीच्या विसर्जन मिरवणुकीत ध्वनी मापन केले जाते. त्यात बिंदू चौक, मिरजकर तिकटी, बिनखांबी गणेश मंदिर, महाद्वार रोड, पापाची तिकटी, गंगावेश अशा विविध परिसराचा समावेश आहे. तेथील मापनामध्ये चारही क्षेत्रांत ध्वनी मर्यादेचे उल्लंघन झाल्याचे स्पष्ट झाले आहे.




कित्येक वर्षांपासून आम्ही गणेशोत्सवाच्या दरम्यान होणाऱ्या आवाजाच्या प्रदूषणाचे मोजमाप करत आहोत. निरीक्षणानुसार शहरातील गणेशोत्सवामधील ध्वनी पातळी ही नेहमीच केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या मर्यादेपेक्षा जास्त राहिली आहे. मुख्यत्वे साउंड सिस्टीमचा वापर हे ध्वनी प्रदूषणाचे कारण दिसते.

**- डॉ. आसावरी जाधव**, पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ

## पाच वर्षांच्या नोंदीतून धोक्याचा इशारा

### निवासी, शांतता क्षेत्रातही वाढता आवाज

■ सार्वजनिक विसर्जन मिरवणुकीत सायंकाळी सहा ते रात्री बारा या वेळेत आवाजाची पातळी अधिक वाढली आहे. आता निवासी, शांतता क्षेत्रातही ध्वनी मर्यादेपेक्षा आवाजाचे प्रमाण वाढत आहे. वाढत्या ध्वनी प्रदूषणात उत्सव काळातील फटाके, बाजारपेठेतील वर्दळ, लाऊड स्पिकर, पारंपरिक वाद्यांचा दणदणाट, वाहनांच्या आवाजाचाही समावेश असल्याचे पर्यावरणशास्त्र विभागाच्या नोंदीतून समोर आले आहे.



आवाजाची मर्यादा (डेसिबलमध्ये)

### 'राजारामपुरी'ने मर्यादा ओलांडली

■ शहरात गणेश चतुर्थी दिवशी राजारामपुरी परिसरातील मंडळांतर्फे आगमन मिरवणूक काढली जाते. त्यात साऊंड सिस्टीमचा वापर केला जातो. तेथे गेल्यावर्षी पहिल्यांदाच गणेश चतुर्थी आणि त्याच्या दुसऱ्या दिवशी पर्यावरणशास्त्र अधिविभागाने ध्वनिमापन केले. त्यात दिवसा आणि रात्री ध्वनी मर्यादा ओलांडली असल्याचे दिसून आले.

### ध्वनिमापनाचे आकडे काय सांगतात? (डेसिबलमध्ये)

| व्यावसायिक क्षेत्र | वर्ष २०२१ | २०२२ | २०२३ | २०२४ | २०२५ |
|---|---|---|---|---|---|
| लक्ष्मीपुरी | ५४.०८ | ७४.१० | ५६.२ | ६३.९ | ५९.४७ |
| बिंदू चौक | ५५.१० | ७४.९० | ६०.० | ७४.८ | ७५.९९ |
| मिरजकर तिकटी | ५४.०१ | ८०.१६ | १०२ | ७६.६ | ७३.४५ |
| बिनखांबी गणेश मंदिर | ५७.०६ | ८१.५२ | १०१.५ | ६०.५ | ७६.११ |
| महाद्वार रोड | ५२.३० | ८२.१५ | ८८.८ | ८७.५ | ७४.५२ |
| गुजरी कॉर्नर | ५२.०१ | ७९.०० | ८७.९ | ८५.७ | ७५.६१ |
| पापाची तिकटी | ६०.०२ | ८५.५० | ९६.९ | ९०.१ | १०० |
| गंगावेश | ६३.०८ | ८२.३० | ७७.६ | ९४.३ | ८५.३७ |
| शाहूपुरी | ५३.०२ | ६७.८० | ५७.७ | ८४.९ | ९५.६१ |
| राजारामपुरी | ५२.०३ | ७०.०० | ६४.९ | ९५.३ | ९७.७२ |
| **निवासी क्षेत्र** | **वर्ष २०२१** | **२०२२** | **२०२३** | **२०२४** | **२०२५** |
| शिवाजी पेठ | ४४.०९ | ७०.११ | ७५.२ | ७९.३ | ७३.३६ |
| मंगळवार पेठ | ४६.२० | ७८.३० | ७८.२ | ८१.१ | ६६.९२ |
| उत्तरेश्वर पेठ | ५१.०२ | ७६.०० | ६९.७ | ८२.६ | ६५.६१ |
| राजारामपुरी | ४०.०१ | ६४.२० | ५२.०० | ९५.३ | ६५ |
| नागाळा पार्क | ४४.२३ | ५४.५० | ६१.६ | ७६.१ | ५१.९० |
| ताराबाई पार्क | ४७.३० | ५६.१० | ६३.१ | ८३.३ | ६६.९२ |
| **शांतता क्षेत्र** | **वर्ष २०२१** | **२०२२** | **२०२३** | **२०२४** | **२०२५** |
| सीपीआर रुग्णालय | ५६.०६ | ७०.१० | ४२.९ | ५९.६ | ७६.२९ |
| जिल्हाधिकारी कार्यालय | ५१.०३ | ६८.५० | ८०.१ | ६१.२ | ७७.८९ |
| न्यायालय | ५५.०४ | ७२.०० | ५३.७ | ६८.८ | ७१.०२ |
| शिवाजी विद्यापीठ | ३९.९० | ५०.६० | ४५.२ | ७१.१ | ४९.२३ |
| **औद्योगिक क्षेत्र** | **वर्ष २०२१** | **२०२२** | **२०२३** | **२०२४** | **२०२५** |
| वाय. पी. पोवारनगर | ५४.६० | ६२.१६ | ६१.०५ | ६६.०० | ७३.७२ |
| शिवाजी उद्यमनगर | ५६.५० | ५८.४० | ५८.४५ | ७८.४ | ९३.९५ |

01 SEP 2026
पुढारी

# बी.एस्सी. जीवरसायनशास्त्र प्रवेशासाठी १५ पर्यंत मुदत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या जीवरसायनशास्त्र अधिविभागात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून बारावीनंतर बी.एस्सी. (जीवरसायनशास्त्र) पदवी अभ्यासक्रम नव्याने सुरू केला आहे. प्रवेशासाठी १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिल्याची माहिती अधिविभागप्रमुख डॉ. कैलास सोनवणे यांनी दिली. जीवरसायनशास्त्र अधिविभागात ४० वर्षांपासून एम.एस्सी. व पीएच.डी. अभ्यासक्रम सुरू आहेत. नव्याने सुरू झालेल्या बी.एस्सी. अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांना औषधनिर्मिती, ड्रग्ज टेस्टिंग, फूड टेस्टिंग, न्यायवैद्यक व नमुना परीक्षण प्रयोगशाळा, माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रात करिअरच्या संधी उपलब्ध होणार आहेत. क्लिनिकल डेटा रिसर्च, डेटा विश्लेषण, डेटा मायनिंग, पॅटर्न रिकग्निशन, संशोधन व विकास क्षेत्रातही रोजगाराच्या संधी आहेत. सहाव्या सेमिस्टरमध्ये औद्योगिक प्रशिक्षणाची सुविधा असून प्रशिक्षणार्थींना दरमहा १२ हजार रुपये भत्ता देण्यात येणार आहे.

01 SEP 2026
जनप्रवाह

# बी.एस्सी. जीवरसायनशास्त्र प्रवेशासाठी १५ सप्टेंबरपर्यंत संधी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या जीवरसायनशास्त्र अधिविभागात सन २०२६-२७ पासून बारावीनंतर बी.एस्सी. (जीवरसायनशास्त्र) या विषयात पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. करिअरच्या आणि संशोधनाच्या अभिनव संधी असणाऱ्या या अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी येत्या १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या अभ्यासक्रमांतर्गत सहाव्या सेमिस्टरमध्ये घेण्यात येणाऱ्या औद्योगिक प्रशिक्षणांतर्गत १२ हजार ५०० इतका मासिक भत्ता देण्याचीही व्यवस्था आहे. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे, असे आवाहन अधिविभागप्रमुख डॉ. कैलास सोनवणे यांनी दिली आहे. डॉ. सोनवणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवाजी विद्यापीठाच्या जीवरसायनशास्त्र अधिविभागात एम.एस्सी. आणि पीएच्.डी. हे अभ्यासक्रम गेल्या ४० वर्षांपासून प्रभावीपणे सुरु आहेत. सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून बी.एस्सी. हा अभ्यासक्रम नव्याने सुरू केला आहे. या नंतर विद्यार्थ्यांना औषध निर्माण कंपन्या, शासनाच्या प्रयोगशाळांत ड्रग टेस्टिंग, फूड टेस्टिंग, शासकीय न्यायवैद्यक तसेच नमुना परीक्षण प्रयोगशाळा, माहिती तंत्रज्ञान कंपन्यामध्ये विविध करिअरच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत.

0 1 SEP 2026

पुढारी

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे मार्गदर्शन

**कोल्हापूर :** सहायक प्राध्यापक पदासाठी घेण्यात येणाऱ्या महाराष्ट्र राज्य पात्रता परीक्षा सेट परीक्षेची प्रभावी तयारी करण्यासाठी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने १ ते ५ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता सेट परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा होणार आहे. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कुलसचिव डॉ. विलास शिंदे अध्यक्षस्थानी असतील, अशी माहिती संचालक प्रा. डॉ. प्रतिभा पाटणकर यांनी दिली.